VOL- IX ISSUE- V MAY 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# जागतिक शांतता आणि भारताचे पराष्ट्र धोरण

**डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले**
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

जागतिक शांतता आणि सुरक्षा हे स्वातंत्र्य भारताचे उदिष्ट राहिले आहे. विश्वामध्ये कायम स्वरूपी शांतता राहिली पाहिजे आशा प्रकारची भूमिका नेहरू ते मोदी या कालावधीत भारताने घेतली आहे. जगा आणि जगू द्या, हे विश्वच माझे घर हे, भारताचे प्रमुख तत्व आंतराष्ट्रीय राजकारणात राहिले आहे. भारत १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला आणि भारताने तत्कालीन अमेरिका,रशिया यांच्यातील शीतयुद्धच्या राजकारणापासुन आलिप्त राहून शांततेच्या मार्गाने आपला विकास साधनाचा प्रयत्न सुरु केले. भारताच्या ऐतिहासिक वारसाच भारताला शांतता,आदर्श प्रामाणिकता, सहकार्य,बंधुत्व, परोपकार अशा तत्वानी जाण्यास भाग पाडतो. कारण ज्या महान संत महात्मांनी भारताला जो मार्ग दाखवला तो आजपर्यंत टिकून आहे. भगवान गौतम बुद्ध भगवान महावीर व इतर महान विभूतीने आपणाला जो संदेश दिला आहे तो भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे. तो आपण आजपर्यंत जपला, येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी हा वारसा आणि संदेश देशाच्या इतिहासात असणे आवश्यक आहे.

## १] शीतयुद्ध कालखंड १९४५-१९९०

१९४५ ला दुसरे महायुद्ध संपले आणि जगामधल्या दोन महासत्तामध्ये वैचारिक गट पडले. एका बाजूला लोकशाही (भांडवलशाही) तर दुसऱ्या बाजुला साम्यवाद ,अमेरिका आणि रशियातील संघर्ष हा बघता बघता टोकला गेला आणि या संघर्षात या दोन्ही महासत्तानी नव्याने स्वातंत्र्य झालेल्या राष्ट्रांना आपापल्या गटामध्ये घेण्यासाठी हे जागतिक राजकारणात दबाव वाढवला, अमेरिकेने भारताला अमेरिकन समूहात येण्याचे निमंत्रण दिले पण भारताचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री व प्रधानमंत्री प.नेहरू यांनी आम्ही जागतिक राजकारणातील कोणत्याही गटात सहभागी होणार नाही अशी भुमीका घेऊन उलट अमेरिका व रशियाला जागतिक शांतता टिकवण्याचे आव्हान केले शीतयुद्धचे राजकारणापासून अलिप्त राहून भारताने रशिया आणि आशिया राष्ट्राचा विकासासाठी प्रयत्न सुरु केले. १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेची जागतिक शांतता व सुरक्षेसाठी स्थापना करण्यात आली होती भारत हा संयुक्त राष्ट्रसंघटनेचे संस्थापक सदस्य देश होता. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शांतता मोहिमेत भारत सहभागी होत होता.उदा. चीन-तिबेट वाद,भारत-चीन युद्ध,व्हिएतनाम युद्ध, चीन-रशिया सीमावाद अशा अनेक प्रश्नामध्ये भारताने संयुक्त राष्ट्र संघटनेला सहकार्य केले. आलिप्ततावादी हि संघटना स्थापन करून भारताने जगातील गरीब देशाना शांततेचा मार्गाने त्याचा विकास करण्यासाठी व्यसपीठ उपलब्ध करून दिले अलिप्त राष्ट्रसंघटने मध्ये आशिया आणि आफ्रिका खंडातील देश सहभागी झाले होते. या खंडातील देशासमोर अनेक अडचणी आणि आव्हाने होते ती सोडविण्यासाठी या देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी आवश्यक होते. विकासासाठी शांतता आवश्यक असते आणि तत्कालीन शीतयुद्धांचे राजकारण स्फोटक झाले होते. मग अशा परिस्थिमुळे भारताने या देशाना संघटित करून या देशांचा विकास करण्याचा प्रयत्न केला आणि भारताला यामध्ये मोठे यश मिळाले ,कारण आलीप्त राष्ट्र संघटनेला जागांमधून मोठा प्रतिसाद मिळाला .

भारताने अमेरिका व रशियाला शांततेच्या मार्गाने यांच्यातील वाद सोडविण्याचा आग्रह पण या दोन्ही राष्ट्रांनी जागतिक राजकारणात आपले वर्चस्व राहावे यासाठी प्रतिष्ठापपणाला लावली याचा शेवट १९९० मध्ये रशियाच्या पतनाने झाला. पण शीतयुद्धांच्या संघर्षच्या काळात भारताने जागतिक शांतता व सुरक्षेसाठी जे प्रयत्न केले ते महत्वाचे होते याची किंमत पण भारताला मोजावी लागली कारण भारताने जागतिक शांतता व आदर्शवाद हे मुद्दा स्वीकारले होते. १९६२ मध्ये याच तत्वामुळे चीनने भारताचा पराभव केला असे अभ्यासक सांगतात तरीही भारताने जागतिक शांतता हे तत्व सोडले नाही.

## २] शीतयुद्धोत्तर भारताचे परराष्ट्र धोरण १९९१ ते २०२१

१९९१ मध्ये रशियाचे विघटन झाले आणि १९४५ पासून सुरु झालेल्या शीतयुद्धचा अंत झाला. त्यानंतर नवीन जागतिक व्यवस्थांचा उदय जगामध्ये झाला. १९९१ नंतर जागतिक राजकारणात गटातटाचे,वादविवाद,आणि महासत्ताचे जीवघेणे राजकारण येणाऱ्या काळात राहणार नाहीत असे जगाला वाटू लागले होते, तसेच जागतिक शांततेला सर्व राष्ट्र महत्व देतील असे वाटू लागले होते पण

१९९१ मध्ये अमेरिकेने खाडी युद्धात हस्तक्षेप करून, नवीन जागतिक राजकारण अमेरिका केंद्रात असेल हा संदेश देण्याचा प्रयत्न केले आणि तसेच झाले. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (सिनियर) यांनी नवीन जागतिक व्यवस्था हि एककेंद्री म्हणजेच अमेरिका केंद्रित असेल अशी घोषणा केली आणि पुन्हा जागतिक शांततेला या घोषणांमुळे धक्का बसला नवीन जागतिक राजकारणात भारताच्या शांतता विषय पराष्ट्र धोरणात जी भूमिका आणि महत्व राहिले ते धोरणात्मक राहिले आहे.

**A] नरसिंहराव काळातील परराष्ट्र धोरण**

१९९१ मध्ये पी.व्हि. नरसिंहराव भारताचे ९ वे पंतप्रधान म्हणून सतेवर आले,नरसिंहराव यांनी जागतिकीकरण,खासगीकरण व उदारीकरणाच्या माधयमातून भारताचा आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला, आणि या कार्यात त्यांना मनमोहनसिंग यांची समर्थ साथ मिळाली. १९९१ हे वर्ष भारतासाठी आव्हानात्मक राहिले आहे. कारण या काळात भारताची अर्थव्यवस्था खूप मोठया संकटात सापडली होती आणि या संकटातून नरसिंहराव आणि मनमोहनसिंग यांनी भारताला सावरले . अशा परिस्थिती भारताची आर्थिकस्तिथी नाजूक असताना जागतिक राजकारणात शांतता प्रस्तापित करण्यासाठी भारताने प्रयत्न केले पण अमेरिका,चीन व पाकिस्तान सारखे राष्ट्र जागतिक शांततेविरुध भूमिका घेत होते. त्यामुळे भारताच्या व संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या जागतिक शांततावादी भूमिकेला अडसर निर्माण होऊ लागला.

**B ] गुजराल सिद्धांत [ Gujral Doctrine]**

आय.के. गुजराल १९९६ ते १९९८ या काळात भारताचे परराष्ट्रमंत्री व भारताचे प्रधानमंत्री होते. गुजराल यांनी भारताचे परराष्ट्र धोरण व शांततेसाठी जे विचार आणि भूमिका मांडली त्यालाच गुजराल धोरणामध्ये :

A] भारत पाकिस्तान संबंध शांततेच्या मार्गाने सोडवणे,

B] सार्क संघटनेच्या माध्यमातून दक्षिण आशियातील देशासोबत शांतता,विकास व सहकार्य वाढविण्यावर भर देणे.

C] भारताचे आर्थिक व व्यापारी हितसंबंध शांततेच्या मार्गाने वाढीस लावणे व भारताच्या आर्थिक विकास करणे.

अशा तत्वाचा समावेश करण्यात आले, गुजराल यांनी शांततेला जास्त महत्व भारताच्या आर्थिक विकासासाठी दिले होते.

**C ] अटलबिहारी वाजपाई [१९९८ ते २००४]**

अटलबिहारी वाजपाई यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार 1998

N D A 1998 मध्ये स्थापन झाले. या सरकारच्या काळात जागतिक शांतता व भारताचे हितसंबंध या धोरणांना जास्त महत्व दिले.

१] विभागीय महासत्ता होण्यासाठी प्रयत्न करणे

२] अमेरिका इस्त्राईल व पूर्व आशियातील देशासोबत संबंध सुधारणे

३] भारताला अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनवने

४] दहशतवादाला आंतराष्ट्रीय दहशतवादाशी जोडणे

५] सुरक्षा समितीत कायम सदस्यत्व मिळवणे

दहशतवादाला विरोध करून वाजपाई यांनी शांततेला महत्व दिले व पाकिस्तान सोबत चांगला संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला १९९९ न्यूयॉर्कमध्ये वाजपाई व नवाज शरीफ यांची भेट झाली. दिल्ली-लाहोर बस सेवा सुरु करून शांततेच्या मार्गाने,जाण्याचा प्रयत्न केला. शांततेसाठीच 'आग्रा करार',' लाहोर करार' झाला. पाकिस्तानसह वाजपाईनी भारताच्या शेजारील देशासोबत चांगले संबंध ठेवून विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**D] मनमोहनसिंग गांधी सरकार २००४ ते २०१४ UPA 1 & 2**

मनमोहनसिंग सरकारचे परराष्ट्र धोरण हे शांतता,राष्टहित, व जगामधल्या सर्व देशासोबत सहकार्य शांततेचे संबंध यावर आधारित आहे. अमेरिकेबरोबर संबंध सुधारण्यावर वाजपाई यांच्याप्रमाणे मनमोहनसिंघानीही प्रयत्न केले. संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतताविषयक प्रश्नावर नेहमी साथ, देऊन दहशतवादाला विरोध करून शांततेला प्राधान्य, देशादेशामधले वाद शांततेच्या मार्गाने सोडविण्यावर या सरकारने प्रयत्न केले.मुळात मनमोहनसिंग हे शांतताप्रिय,संयमी, अभ्यासू, आणि सकारात्मक विचार करणारे अशी त्यांची प्रतिमा होती. आणि आपल्या प्रतिमेप्रमाणे त्यांनी आंतराष्ट्रीय राजकारणात काम केले. मनमोहनसिंग हे सलग १० वर्ष भारताचे प्रधानमंत्री होते, त्यांचा दोन्ही कालखंडात त्यांनी पाकिस्तानसह सर्व देशासोबत शांतातेच्या मार्गाने सहकार्यचे संबंध वाढविण्यावर भर दिला सार्क, यूरोपपियन महासंघ,आणि इतर जागतिक संघटनेसोबत संबंध वाढविण्यावर भर देऊन भारताचा आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न या सरकारने केला मनमोहनसिंग सरकारने राष्ट्रहिताच्या बाबत कोणतीही तोडफोड केली नाही. भारताचे सार्वभौमत्व आभादीत ठेऊन त्यांनी जागतिक राजकारणात वेगवेगळ्या विषयावर काम केले.

**E ] नरेंद्र मोदी सरकार [२०१४ ते २०२०]**

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी हे भारताचे प्रधानमंत्री झाले,पंतप्रधानपदाच्या शपथविधीसाठी नरेंद्र मोदी यांनी भारत शेजारील पाकिस्तानसह सर्व देशाच्या प्रामुख्याना उपस्तिथ राहण्याचे निमंत्रण दिले होते . यावरून हे स्पष्ट झाला कि नरेंद्र मोदी सरकार शेजारील देशासह, जागातिल मोठया राष्ट्रांबरोबर चांगले संबंध निर्माण करण्याचा त्यांचा येणाऱ्या

काळात प्रयत्न असेल असा संदेश त्यांनी दिला. look East च्या जागी त्यांनी Act East धोरण स्वीकारले, १९९१ पासून Look East धोरण भारताचे आंतराष्ट्रीय धोरण होते, पण मोदी सरकारने Act East धोरण स्वीकारून भारताच्या नवीन पराष्ट्र धोरणाला प्रारंभ केला. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी महासत्तेचा दौरा केला आशिया,आफ्रिका व यूरोपखंडातील देशांना भेट देऊन विकास,शांतता व सहकार्य या तत्वावर भर देऊन 2024 पर्यंत USD 5 trillion भारताची अर्थव्यवस्था करणार अशी घोषणा करून भारत जागतिक आर्थिक महासत्ता होणार असे जाहीर केले.विशेष म्हणजे मोदी सरकारने पण जागतिक शांततेला महत्व देऊन भारताचे राष्ट्रीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला.

**निष्कर्ष :-**

१] जागतिकीकरण,खासगीकरण,उदारीकरणामुळे भारताचा आर्थिक विकास झाला.

२] भारताने राष्ट्रहित व सुरक्षेच्या बाबतीत तोडफोड केली नाही.

३] जागतिक शांततेला महत्व देऊन सहकार्य व विकास यावर भर दिला.

४] सर्वभौमत्वाला महत्व दिले.

५] भारताने अण्वस्त्र संपन्नता सिद्ध केली.

६] भारत अमेरिका नागरी अणुऊर्जा सहकार्य करार झाला.

७] मोदी सरकारने वास्तववादी परराष्ट्र धोरण राबून Act East धोरण स्वीकारले.

८] मोदी सरकारने चीन, पाकिस्तानला आव्हान दिले.

९] दहशतवादाचे मोदी सरकारने कंबरडे मोडले.

**संदर्भ :-**

१] नीलम-आंतराष्ट्रीय मंच पर भारत, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्रायवेट लिमिटेड नई दिल्ली

२] शैलेंद्र देवळाणकर - समकालीन जागतिक राजकारण विघा बुक्स पुब्लिशर्स, औरंगाबाद .

३] विकिपीडिया

४]महाराष्ट्र टाइम्स-परराष्ट्र धोरणाच्या अभ्यास २३ आक्टोबर २०१५

५] विक्रांत पांडे - भारताचे "नेबरहुड फर्स्ट" परराष्ट धोरण, वायर